# **बी. ए.** भाग ३

# भाषाविज्ञान आणि मराठी भाषा

## प्रकरण १

### भाषेच्या उपपत्ती किंवा सिध्दांत

भाषेची उत्पत्ती केव्हा झाली या प्रश्नाला आधुनिक भाषाशास्त्रात फारसे महत्त्व नाही. कारण विनम्रता हा शास्त्राचा विशेष असतो. मानव अवती-भवतीच्या नादांमधून हावभाव,मनोविकार,नृत्य,संगीताकडे बघून भाषा बनवू शकतो. पण सामाजिक नियम करून,कायदे करून भाषा निर्माण होत नाही तर भाषा ही मानवी गरजेप्रमाणे आपोआप निर्माण होते.

**सिध्दांत**

**१. ईश्वरनिर्मित सिध्दांत**

सर्व प्रयत्नांती माणूस ईश्वराला शरण जातो. त्याप्रमाणे भाषा ही ईश्वराने निर्माण केली. तसेच मन,प्राण ही तत्वे ईश्वरी कर्तृत्व मानले जाते.

**चार्वाक** याने गुढवादी दृष्टीकोनातून वेद,उपनिषदांच्या आधारे भाषा ईश्वरनिर्मित मानली.

ऋग्वेदातील वर्णनानुसार आधी भाषेची उत्पत्ती व नंतर सर्व वस्तूंना नामध्येय दिली गेली.

ख्रिश्चन धर्मात परमेश्वराने जग निर्माण केले तेव्हा एकच भाषा होती. नंतर मात्र घोटाळा होवू नये म्हणून निरनिराळया भाषा निरनिराळया देशांत फेकल्या गेल्या.

मुसलमानांच्या मते, पाकवाणी हे ईश्वरी कर्तृत्व आहे.

**समीक्षा**

ईश्वरी कर्तृत्व हे फक्त ध्वनी निर्मितीपुरते असते. त्यानंतरची सर्व उभारणी ही मानवानेच केलेली दिसते. भाषा ही ईश्वरनिर्मित असती तर प्रारंभीच ती विकसीत स्वरूपात दिसली असती पण भाषा ही हळूहळू विकसीत होत गेलेली दिसते.

**२. राजा व समाजनिर्मित सिध्दांत** ( **ॲरिस्टॉटल** )

परस्परांच्या विचार विनिमयासाठी भाषेची गरज भासली तेव्हा कोणत्या तरी राजाने,पुढा-याने किंवा समाजप्रमुखाने सभा बोलावून व्यवहाराच्या सोयीकरिता काही शब्द किंवा शब्दसमूह तयार करून भाषेला प्रारंभ केला असावा असे मत **रूसोप्रभृती** या विचारवंताने सांगितले.

**समीक्षा**

या युक्तीवादाला फारसा अर्थ नाही. कारण जेथे भाषाच नाही तेथे विचारवंत एकत्र येणे, परस्परांशी चर्चा करून नियम तयार करणे शक्य नाही. शिवाय जरी नियमावली तयार झाली तरी त्याप्रमाणे सर्व लोकांनी बोलावीच असी सक्ती होवू शकत नाही. भाषा नेहमी स्वतःच्या नियमानुसार वाढते. इतरांच्या नियंत्रणात तिचा विकास होत नाही. म्हणून भाषा ही समाजनिर्मित असते हे मत मान्य होत नाही.

**३. इंगित सिध्दांत** (Gestural Theory)

मनोविकारांच्या अविष्कारासाठी वैशिष्टयपूर्ण शारीरिक हालचालींचा उपयोग होतो. रेड इंडियनसारख्या जमाती आजदेखील हावभावभाषेचा उपयोग करतात. त्यामुळे भाषा आणि हावभाव यांचा संबंध आहे असे दिसते. मानवाने देखील इतर प्राण्यांच्या हालचालीच्या अनुकरणाने शरीरावयवांच्या हालचाली करण्यास प्रारंभ केला असावा. ज्याप्रमाणे पशू आपल्या

हालचालीबरोबर ध्वनी उच्चारतात त्याप्रमाणे आदिमानवाने विविध मनोविकार व्यक्त करताना हावभावाबरोबर ध्वनींचे उच्चार केले असावेत आणि त्यातून भाषेची निर्मिती झाली असावी असे काही अभ्यासकांना वाटते.

**डॉ.राय** यांनी हावभावातून भाषा निर्माण झाली असावी असा सिध्दांत मांडला आणि असंबंध भाषांच्या तुलनात्मक अभ्यासाने **डार्विनने** त्याचा पुरस्कार केला.

हावभाव अर्थसूचक असले तरी हावभावाच्या भाषेला मर्यादा पडतात. अंधार,अंतर यांच्या अदथळयामुळे सर्व मनोभाव व्यक्त होऊ शकत नाहीत. त्यामुळे हावभावापेक्षा प्रभावी माध्यम शोधण्याचा प्रयत्न करताना मौखिक ध्वनींचा वापर करण्याची कल्पना मानवाला सुचली असावी. या कल्पनेमागेदेखील पशूंप्रमाणे ध्वनी वापर करण्यात अनुकरणशीलता असावी.

**४.अनुकरण सिध्दांत / भो - भो सिध्दांत**

**डॉ.गायगर** या भाषा शास्त्रज्ञाने हा सिध्दांत मांडला. यालाच भो-भो असे म्हटले जाते. कावकाव करणारा कावळा, चिवचिव करणारी चिमणी वगैरे प्राण्यांची नावे त्या प्राण्यांच्या ध्वनींच्या अनुकरणातून पडलेली दिसतात. काही कियावाचक शब्दातील ध्वनींवरूनही भाषा निर्माण झाली. उदा. मुळूमुळू रडणे, टर्रकन फाटणे इ. **यास्काचार्यांनी** या सिध्दांताला पाठींबा दिला. कोकीळ पक्षाचे नाव त्याच्या कुहू-कुहू ध्वनीवरून पडले असावे.

**समीक्षा**

काही प्राण्यांची नावे ही जरी ध्वनीवरून पडली असली तरीही सर्वच प्राण्यांच्या बाबतीत हे योग्य ठरत नाही. उदा. डरॉव-डरॉव करून ओरडणारा बेडूक. हिंदीत-मेंढक, इंग्रजीत-फ्रॉग तर संस्कृतमध्ये-दर्दुर या नावाने ओळखला जातो. शिवाय अनेक प्राणी अर्थहिन ध्वनी काढतात. प्राणी व निसर्ग सोडल्यास इतर क्षेत्रात शेकडो शब्द निर्माण झाले. उदा. आकाश, घर, झाड, पान इ. हे शब्द कोणत्याही अनुकरणातून निर्माण झाले नाहीत. त्यामुळे हा सिध्दांत अपुरा ठरतो.

**५.रणन किंवा डिंगडॉग सिध्दांत / वस्तुनादानुकरण सिध्दांत**

**प्लेटोने** हा सिध्दांत मांडला व **मॅक्समुलरने** त्याची विस्ताराने मांडणी केली. जगातील प्रत्येक वस्तूला एक स्वतंत्र ध्वनी असतो. ध्वनीच्या संवंधावरून शब्दांची निर्मिती झाली असावी. एखादया हातोडयाने आपण लाकडावर,विटेवर,दगडावर किंवा जमिनीवर प्रहार केला तर तो कोणत्या वस्तूवर मारल्यामुळे होतो हे आपणास केवळ त्या ध्वनीवरून समजते. प्रारंभीच्या काळात माणसाला विविध वस्तूंचा बोध त्याच्या ध्वनीवरून झाला. अशा सुमारे चार-पाचशे ध्वनीतून भाषा निर्माण झाली.

**समीक्षा**

अनेक ध्वनींचा व अर्थाचा संबंध जाणण्याची माणसाची शक्ती शास्त्रज्ञांना मान्य नाही. वस्तूदर्शक शब्द व त्यांचा नाद यातील संबंध शास्त्रीय बैठकीवर टिकणारा नाही म्हणजेच आधी नाद व मग शब्द हा कम पटण्यासारखा नाही असे विद्वानांना वाटते.

**६. भावनाभिव्यक्ती सिध्दांत / पो-पो सिध्दांत**

मनुष्य हा विचार प्रधान व भावना प्रधान प्राणी आहे. दुःख, सुख, आशा, निराशा, तिरस्कार-घृणा इ. भावनांच्या निदर्शनासाठी मानवाने जे भावनादर्शक उद्गार काढले असतील त्यातून भाषा निर्माण झाली असे **कॉंडीलॅक** या भाषाशास्त्रज्ञाने सांगितले. उदा. अबब!, अरेरे! इ. उद्गारातून विविध प्रकारच्या भावना निर्माण होतात. भाषेच्या उत्पत्तीचे व वाढीचे कारण भावनाप्रधान शब्द हे होय.

**समीक्षा**

भावनामय उद्गारातून भाषा निर्माण झाली असेल तर प्रत्येक भाषेतील उद्गार समान असायला हवेत. परंतु असे दिसत नाही. काही ठिकाणी हा भावनामय उदगार सिध्दांत लागू पडत नाही. कारण विकार प्राबल्यामुळे काहीवेळा तोंडातून शब्द बाहेर पडत नाहीत. अशा अवस्थेत भाषा खुंटते. मग तिची वाढ कशी होणार. शिवाय सर्व भावनांचे उद्गार लेखनात जसेच्या तसे लिहिणे शक्य नसते. तसेच काही भावना उद्गारातून पूर्ण अर्थ दाखवत नाहीत. उदा. तिरस्कार, निंदा इ.

**७ .श्रम परिहार सिध्दांत / यो-हि-यो सिध्दांत**

**लुडविग न्वार** या भाषाशास्त्रज्ञाने हा सिध्दांत मांडला .कोणतेही शारीरिक श्रम करताना मुखातून जे ध्वनी बाहेर पडतात त्यातून भाषेतील शब्द तयार झाले असावेत .कपडे धुताना हुश्शः हुश्शः, व्यायाम करताना हुः हुः असे विविध ध्वनी निघत असतात .मोठा दगड ढकलताना विविध प्रकारचे ध्वनी मुखावाटे काढून माणसे श्रम हलके करतात .श्रम परिहारासाठी म्हंटल्या जाणा-या गीतातून भाषा उदयास आली असावी असा सिध्दांत यांनी मांडला .शेतातील पीक काढताना शेतकरी भलरी दादा भलरी हे गाणे म्हणतात . डोक्यावरून भाज्यांचे हार घेऊन मूरडत,तालावर चालणा-या स्त्रिया रामाच्या गं बागेमधी हे गाणे गातात .तसेच जात्यावर बसून दळण सुरू झाले की, मजेदार ओव्या बाहेर पडतात व त्यातून श्रम नाहीसे होतात .

**समीक्षा**

श्रम परिहारासाठी जे ध्वनी बाहेर पडले .त्यातून संपूर्ण भाषा उदयास आली असे म्हणता येणार नाही .कारण या उद्गारात भाषानिमिर्तीचे सामर्थ्य असते हे युक्त वाटत नाही .भाषेतील मूळ शब्द हे आज्ञार्थी असावेत .तसेच निर्माण झालेल्या ध्वनीचे सातत्याने उच्चाटन करून समूहमान्य संकेत निर्माण होणे शक्य नाही .त्यामुळे हा सिध्दांतही अपुरा ठरतो .

**८ .प्रेमगानमूलक सिध्दांत / संगीत सिध्दांत**

परस्परांवर प्रेम करणे ही मानवाची सहजप्रवृत्ती .या प्रेमाच्या धुंदीत स्त्री-पुरूष एकमेकांभोवती फेर धरतात,नाचतात व एकमेकांना खुश करण्यासाठी ते गुणगुणू लागतात .**ऑटो जेस्परसन** यांच्यामते, भावना व्यक्त करण्यासाठी संगीत बापरले गेले व त्यातूनच भाषा जन्मली असावी .त्यांच्या या मताला **डार्विन** व **स्पेन्सर** यांनी पाठींबा दिला . स्त्री-पुरूषांनी परस्परांच्या संतोषासाठी जी गुणगुण केली तिच भाषेचे मूळरूप होय .आदीमातेने आपल्या रडणा-या मूलास झोपवण्यासाठी प्रेमाने अंगाई गितासारखी गोड गाणी म्हटली असतील त्यातून भाषेचा उदय झाला असावा .

मात्र,या उपपत्तीतील आदीमानवाच्या गुणगुणन्यातील अक्षरे भाषा कशी आकार देवू शकेल हे स्पष्ट होत नाही .तसेच,आदीमानव गुणगुणत होता हे केवळ अम्दाजाने व्यक्त केले जाते .

**९ .संपर्क सिध्दांत**

**जी .रेवेज** या भाषाशास्त्रज्ञाने या सिध्दांताचा पुरस्कार केला .मनुष्य प्राणी समाजप्रिय असल्यामुळे एकमेकाशी संपर्क साधण्याची त्याची सहजप्रवृत्ती असते .त्यामुळेच मानव संघटीत झाला .भूक,तहान,संरक्षण,कामपूर्ती इ .संदर्भात समाजात वेगवेगळया स्तरांवर वेगवेगळया प्रकारे संपर्क प्रस्थापित होवू लागले .स्पर्श,मौखीक हावभाव यावरोबरच ध्वनींचेही सहाय्य घेतले जाऊ लागले व त्यातूनच ध्वनी विकसित झाले .या संपर्काचा आधार सुरवातीला भावनात्मक होता .पण पुढे त्याला बौध्दीक स्तर प्राप्त झाले .**डॉ .राये** यांनी हावभावातून भाषा निर्माण झाली असे मत मांडले .पण हावभाव करीत असताना भाषेला मर्यादा पडतात .त्यामुळे हावभावापेक्षा मौखीक ध्वनींचा वापर करणे मानवाला योग्य वाटू लागले व त्यातूनच भाषा निर्माण झाली असावी .

**१० .किडासक्ती सिध्दांत**

अनुकरण ही जशी सहज प्रवृत्ती आहे .तसेच किडासक्ती ही देखील एक उपजत वृत्ती आहे .लहान मुल हात-पाय हालवणे, तोंडाची हालचाल करणे अशा किया उत्साहाने करत असते .या अतिरीक्त सक्तीच्या वापरासाठी त्यांची अखंड चळवळ सुरू असते .त्यातूनच त्यांच्या शारीरिक वाढीस हातभार लागतो .ते अधिक कृतीशील होतात व त्यातूनच त्यांना स्वर उत्पन्न करण्याची शक्ती प्राप्त होते .या स्वराचे संयोग करून त्यातून अर्थाचे संकेत लहान मुले तयार करतात .त्यावेळी ते मुखाने म,म,ब, ब अशी निर्हेतुक बडबड करीत असते .स्वरोत्पादन,स्वरसंयोग,स्वरसंकेत अशा किया वाढत जावून मुले भाषा शिकतात .लहान

मुलांप्रमाणेच भाषा निर्माण होताना वेगवेगळी परिस्थिती कारणीभूत ठरत असते. आदिमानवाने भाषा निर्मितीसाठी क्रिडासक्ती ही प्राथमिक अवस्था मांडली.

**११. समन्वय सिध्दांत**

भाषेच्या उत्पत्तीविषयी बरेच सिध्दांत मांडले गेले. प्रत्येक सिध्दांतात काहीतरी उणीव जाणवल्याने त्यावर आक्षेप घेतले गेले. त्यामुळे कोणताही एक सिध्दांत परिपूर्ण आहे असे म्हणता येत नसल्याने एकही सिध्दांत सर्वमान्य झालेला नाही. त्यामुळे **स्वीट** या भाषाशास्त्रज्ञाने सर्व उपपत्तींचा समन्वय घालण्याचा प्रयत्न केला.

शारीरिक हावभाव आणि ध्वनी संकेतावर आधारित आदिभाषा निर्माण झाली. प्रथम अनुकरणवाचक शब्द नंतर भावना विकारवाचक शब्द आणि मग प्रतिकात्मक शब्द अशी भाषा निर्माण झाली. सातत्याने शब्द वापरल्यामुळे ते विकसित झाले आणि त्यातून नवीन शब्दांची भर पडत गेली.

**निष्कर्ष**

१. भाषानिर्मितीच्या विविध सिध्दांतापैकी एकही सिध्दांत सर्वमान्य नाही. कारण भाषेच्या उत्पत्तीविषयीचे हे सिध्दांत सुटासुटा विचार करतात. म्हणजेच सर्वांग परिपूर्ण विचार एकाही सिध्दांतामध्ये दिसत नाही.

२. लहान मूल ज्याप्रमाणे भाषा शिकते त्याप्रमाणे प्रारंभीच्या काळात मानवाने भाषा निर्माण केली असेल असे काही भाषाशास्त्रज्ञ म्हणतात. पण लहान मूल भाषेचे अनुकरण करते. ते नवीन भाषा निर्माण करत नाही. त्यामुळेच भाषानिर्मितीची प्रक्रिया लहान मुलांच्या भाषेशी मिळती-जुळती असावी.

३. भाषा सुरवातीच्या काळी रानटी जमातींनी निर्माण केली असावी. बोलीभाषा या भाषेप्रमाणेच परिवर्तनशील असतात. त्यामुळेच प्रारंभी निर्माण झालेली भाषा परिवर्तीत झालेली असावी.

४. मानवाची उच्चार प्रक्रिया सतत बदलत असल्यामुळे भाषेच्या लिखित रूपातही बदल होत जातात. त्यामुळेच भाषेची उत्पत्ती नेमकी कशी झाली हे निश्‍चितपणे सांगता येत नाही.